# लोकमंगल कृषी महाविद्यालयातील कृषीदूतांची भंडारकवठे येथील रोपवाटिकेला भेट......



महात्मा फुले कृषी विद्यापीठ संलग्नित व श्री राम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान, वडाळा संचलित लोकमंगल कृषीमहाविद्यालय, वडाळा ता.- उ. सोलापूर, जि- सोलापूर अंतर्गत ग्रामीण जागरूकता कार्यानुभव कार्यक्रम अंतर्गत श्री स्वामी समर्थ रोपवाटिकेला भंडारकवठे ता.- द. सोलापूर, जि.- सोलापूर येथे भेट दिली.

यावेळेस रोपवाटिकेचे मालक भालचंद्र शिंदे सर व सुनंदा शिंदे मॅडम यांच्याकडून माहिती मिळवली. या चर्चासत्रांमध्ये सरांकडून रोपवाटिकेचे व्यवस्थापन, संगीत शेतीचे महत्व, विहीर पुनर्भरण, सौरऊर्जेचा वापर, सेंद्रिय शेतीचे महत्व, आधुनिक पद्धतीने मशीनद्वारे रोपनिर्मिती या विषयांवर मार्गदर्शन लाभले व चर्चा करण्यात आली. यावेळी सरांनी विषमुक्त शेती ही काळाची गरज आहे. माणसांप्रमाणे वृक्षांना संवेदना असतात परंतु ते व्यक्त करू शकत नाहीत. त्यामुळे त्यांनी रोपवाटिकेमध्ये संगीताचा प्रयोग केला आहे.

लोकमंगल कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सचिन फुगे सर व कार्यक्रम अधिकारी प्रा. आकाश अवघडे सर, प्रा. गणेश भोसले सर यांचे या चर्चासत्राच्या आयोजनासाठी मार्गदर्शन लाभले. या चर्चासत्रामध्ये कृषीसम्राट गटाचे कृषीदूत महेश आढेगावकर, पंकज आयरे, संदीप चव्हाण, रोहित गडगे रोहन कौरती, प्रथमेश कुदळे व शेतकरी उपस्थित होते.


पुरोगामी विचाराचे
एकमत
page- 6
06 Sep 2023


# बी. बी. दारफळमध्ये लम्पी प्रतिबंधात्मक मोफत लसीकरण

तालुका प्रतिनिधी : उत्तर सोलापूर



लोकमंगल कृषी महाविद्यालय, वडाळा. रावे अंतर्गत बी.बी.दारफळ गावात मोफत लसीकरणाचे आयोजन करण्यात आले. हे मोफत लसीकरण तीन दिवस विविध शेतकऱ्यांच्या घरोघरी जाऊन करण्यात आले. तीन दिवसाच्या या लसीकरण मोहिमे अंतर्गत जवळपास 200 जनावरांचे लसीकरण करण्यात आले. डॉ. बी. एन.नाझीरकर (सहाय्यक पशुधन विकास अधिकारी), डॉ. आनंद जाधव (सहाय्यक पशुधन विकास अधिकारी) व पशुधन पर्यवेक्षक डॉ आर.डी.देशमुख यांच्याद्वारे लंपी प्रतिबंधात्मक लसीकरण करण्यात आले. या मोफत लसीकरणाचा गावातील बर्याच शेतर्कयांना फायदा झाला. या लसीकरणामुळे लंपीसारख्या संपर्कजन्य रोगाला आळा घालण्यासाठी मदत होणार आहे. या मोफत लसीकरणासाठी प्रतिभा आरेकर, प्रणाली अंधारे, प्रमोदिनी कदम, रेवती गवसणे, वैशाली बोराडे व तनुजा फासे या कृषिकन्यांना लोकमंगल कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ सचिन फुगे तसेच प्रा. ज्ञानसागर सुतार व रावे कार्यक्रम अधिकारी आकाश अवघडे यांनी मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रकाश कोकरे यांनी केले व तर आभार मजनोद्दीन पठाण यांनी मानले.

# माळकवठे येथे मोफत आरोग्य शिबीर राबवण्यात आले.




माळकवठे ता.द.सोलापूर : महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी संलग्न व श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान, वडाळा संचलित लोकमंगल कृषी महाविद्यालयातील कृषिदुतांमार्फत ग्रामीण जागरूकता कार्यानुभव व औद्योगिक प्रात्यक्षिक कार्यक्रमांतर्गत दि.२९/०९/२०२३ रोजी माळकवठे तालुका दक्षिण सोलापूर येथे मोफत आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले .

या आरोग्य शिबिरा मध्ये लोकमंगल आयुर्वेदिक रुग्णालय, वडाळा येथील डॉ.शक्तिजीत बाबर आणि त्यांचे सहकारी किरण वायमोडे , शितल गायकवाड, पांडुरंग भिसे ,समाधान डावरे आदी यांनी माळकवठे येथील ७५ रुग्णांची रक्तदाब, सर्दी-खोकला, ताप व इतर साथीचे आजार यांची तपासणी करून मोफत औषधोपचार केले.

या आरोग्य शिबीराच्या निमित्ताने रक्तातील हिमोग्लोबिन तपासणी देखील करण्यात आली. या कामी लोकमंगल औषध निर्माण शास्त्र महाविद्यालयाचे प्राध्यापक श्री मंजुनाथ मुकणे व विद्यार्थी यांनी परिश्रम घेतले.

या कार्यक्रमास माळकवठे गावच्या सरपंच सौ . जयश्री सगरे, श्री. हनुमंत कुलकर्णी सर, ग्रामपंचायत सदस्य व इतर मान्यवर उपस्थित होते .

आरोग्य शिबिर राबविण्यात लोकमंगल कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सचिन फुगे सर , कार्यक्रम समन्वयक प्रा. आकाश अवघडे सर , व सलमान शेख सर , यांचे मार्गदर्शन लाभले . कार्यक्रमाचे आयोजक कृषीदूत - अमर पांडुरंग कोकरे , शुभम चंद्रकांत केकान , ज्ञानेश्वर राजेंद्र काशीद , अजय कैलास कांबळे , विजय शिवाजी काटकर , योगेश हणमंत माने , गुरुदेव नागनाथ जाधव हे सहभागी होते.


Dainik Rajaswa News




# कृषीदूतांनी सांगितले रोग व्यवस्थापनाचे महत्व

सोलापूर : महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी संलग्नित वडाळा येथील लोकमंगल कृषी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी ग्रामीण कृषी जागरूकता व औद्योगिक कार्यानुभव कार्यक्रम अंतर्गत एकात्मिक रोग व्यवस्थापन याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. यामध्ये भंडारकवठे गावातील शेतकऱ्यांना पिकांवरील रोग व त्यावरील एकात्मिक व्यवस्थापनाची माहिती दिली. निसर्गाला समजून घेऊन वेळोवेळी शेत निरीक्षण करीत राहणे व त्यानुसार रोग नियंत्रणाचे विविध उपाय योजले तर अनावश्यक फवारण्या व त्यावरील खर्चात बचत होते. रोगांची संख्या ठराविक मर्यादित असतानाच बुरशीनाशकाचा वापर झाल्यास फवारण्यांची संख्या कमी करता येते. त्यांचे अंश कमी होतात. पर्यावरणीय हानी कमी होते. कमीत कमी खर्चात परिणामकारक रोग व्यवस्थापन , रासायनिक बुरशीनाशकांचा कमी वापर, उन्हाळ्यातील खोल नांगरट, रोगप्रतिकारक वाणाची निवड, आलटून-पालटून पीक घेणे, जैविक पद्धतीने रोग नियंत्रण या संदर्भात माहिती देण्यात आली. या चर्चासत्राचे आयोजन प्राचार्य डॉ. सचिन फुगे, प्रा. आकाश अवघडे सर, प्राध्यापिका ज्योती जाधवर यांच्या मार्गदर्शनाखाली कृषिदूत महेश आढेगावकर, पंकज आयरे, संदीप चव्हाण, रोहित गडगे, रोहन कौरती, प्रथमेश कुदळे यांनी केले.

सायंदैनिक
राजस्व
आजच्या बातम्या आज वाचा
४

# कृषिदूतांचा माळकवठे येथे शेतीविषयक ॲपचा जागर





सोलापूर : वडाळा येथील लोकमंगल कृषी महाविद्यालयाचे कृषिदूत अमर कोकरे, विजय काटकर, अजय कांबळे, गुरुदेव जाधव, योगेश माने, ज्ञानेश्वर काशीद, शुभम केकान यांनी ग्रामीण कृषी जागरूकता व औद्योगिक कार्यानुभव कार्यक्रम अंतर्गत कृषीक ॲप बाबत मार्गदर्शन करण्यात येवून प्रात्यक्षिकासह माहिती देण्यात आली माळकवठे येथील शेतकऱ्यांना फलोत्पादन शेतीविषयक ॲपबद्दल माहिती दिली. यातून शेतीविषयक मूलभूत आवश्यक माहिती, जसे की पिकावरील रोग, बाजारभाव, पीक व्यवस्थापन इत्यादी गोष्टींची माहिती शेतकऱ्यांना देण्यात आली. या ॲपच्या विविध फायद्यामुळे शेतकऱ्यांना आधुनिक पद्धतीने शेती करण्यासाठी उपयुक्त असल्याचे कृषिदूतांनी सांगितले. लोकमंगल कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सचिन फुगे, रावे कार्यक्रम अधिकारी प्रा. आकाश अवघडे व प्रा. तुषार नामदे, प्रा. कृष्णाजी टिंगरे यांचे मार्गदर्शन लाभले.

पुरोगामी विचाराचे
एकमत
page- 6
14 Sep 2023

# बी. बी. दारफळमध्ये आधुनिक सिंचन पद्धतीचा वापर

**तालुका प्रतिनिधी : उत्तर सोलापूर**




लोकमंगल कृषिमहाविद्यालय वडाळा रावे अंतर्गत बी.बी.दारफळ मधील आधुनिक सिचन पद्धतीचा अभ्यास करण्यात आला. या आधुनिक सिचन पद्धतीमध्ये या गावातील शेतकरी रेन गनचा वापर करतात. ही सिचन पद्धत सर्वप्रथम नायझेरियामध्ये विकसित झाली असून इतर सिचन पद्धतींपेक्षा कमी खर्चीक आहे. यासाठी एकरी 25 ते 30 हजार खर्च येतो. जो की इतर सिचन पद्धतींपेक्षा कमी आहे. ही रेन गन एका ठिकाणाहून दुसर्या ठिकाणी नेता येते. एकसमांतर पुर्ण शेताला पाणी देण्यासाठी एका एकरमध्ये चार ठिकाणी रेन गनचे स्थलांतर करावे लागते. रेन गनचा व्यास 100 फुट असून ती गोलाकार फिरते व 100 फुटापर्यंत पाणी मारते. त्यामुळे एका वेळी पुर्ण गोलाकार 100 फुट क्षेत्र भिजवले जाऊ शकते. अगदी सहजगत्या रेन गन हातळता येत आसल्याने व खर्च कमी असल्याने शेतकरी याचा वापर करत आहेत.

या सिचन पद्धतीचा अभ्यास करण्यासाठी प्रमोदीनी कदम, वैशाली बोराडे, रेवती गवसणे, प्रणाली अंधारे, प्रतिभा आरेकर, तनुजा फासे यांना लोकमंगल कृषिमहाविद्यालय वडाळा चे प्राचार्य डॉ सचिन फुगे, तसेच प्रा.तुषार नामदे व रावे कार्यक्रम अधिकारी प्रा.आकाश अवघडे यांचे मार्गदर्शन मिळाले.



उत्तर सोलापूर : पडसाळी येथे शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना कृषिदूत.

# कृषिदूतांकडून शेतकऱ्यांना मार्गदर्शन

**उत्तर सोलापूर :** वडाळा (ता. उत्तर सोलापूर) येथील लोकमंगल कृषी महाविद्यालयाचे कृषिदूत प्रणित भोसले, गर्जे महेश, प्रसाद जमदाडे, रोहित जावीर, चैतन्य खारे, अभिजित आवताडे, संकेत देवर्षी यांनी पडसाळी येथील शेतकऱ्यांना प्रात्यक्षिकाद्वारे बोर्डो मिश्रणाची माहिती दिली. यातून फळबागांवर पडणाऱ्या विविध रोगांवर कसे नियंत्रण मिळवावे याची माहिती त्याचप्रमाणे मिश्रणाबद्दल फायदे समजून सांगण्यात आले. मिश्रणाबद्दल असणाऱ्या शेतकाऱ्यांच्या शंका दूर झाल्या. या प्रात्यक्षिकाद्वारे लोकमंगल कॉलेज कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सचिन फुगे, रावे कार्यक्रम अधिकारी प्रा. आकाश अवघडे व प्रा. ज्योती जाधवर यांचे मार्गदर्शन लाभले.



सोलापूर : शेतीविषयक ॲपची माहिती देताना लोकमंगल महाविद्यालयातील कृषिदूत.

# कृषिदुतांचा शेतीविषयक ॲपचा जागर

**सोलापूर :** वडाळा येथील लोकमंगल कृषी महाविद्यालयाचे कृषिदूत अमर कोकरे, विजय काटकर, अजय कांबळे, गुरुदेव जाधव, योगेश माने, ज्ञानेश्वर काशीद, शुभम केकान यांनी ग्रामीण कृषी जागरुकता व औद्योगिक कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत कृषी ॲपबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. माळकवठे येथील शेतकऱ्यांना फलोत्पादन शेतीविषयक ॲपबद्दल माहिती दिली. या ॲपच्या विविध फायद्यांमुळे शेतकऱ्यांना आधुनिक पद्धतीने शेती करण्यासाठी हे ॲप उपयुक्त असल्याचे कृषिदूतांनी सांगितले. लोकमंगल कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सचिन फुगे, रावे कार्यक्रम अधिकारी प्रा. आकाश अवघडे, प्रा. तुषार नामदे, प्रा. कृष्णाजी टिंगरे यांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना लाभले.

# लोकमंगल कृषी महाविद्यालयाच्या कृषी दुतांनी प्रात्यक्षिकाद्वारे सांगितले हिरवळीच्या खतांचे महत्त्व



सोलापूर - महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी संलग्नित लोकमंगल कृषी महाविद्यालयाच्या कृषीदुतांनी ग्रामीण कृषी जागरूकता आणि कृषी औद्योगिक कार्यानुभव कार्यक्रमा अंतर्गत हिरवळीच्या खतांचे महत्त्व प्रात्यक्षिकाद्वारे भंडारकवठे येथील शेतकऱ्यांना महत्त्व पटवून दिले व मार्गदर्शन केले. यावेळी हिरवळीचे खत म्हणजे काय व त्यामुळे होणारे फायदे, जमिनीची वाढणारी सुपीकता व वाढणारा सेंद्रिय कर्ब व नत्र पुरवठा व उत्पन्न वाढण्यास होणारी मदत याबद्दल शेतकऱ्यांना माहिती पटवून दिली. सेंद्रिय शेती ही काळाची गरज आहे असा संदेश यावेळी कृषी दुतांनी शेतकऱ्यांना महत्त्व पटवून दिले. यावेळी प्रगतशील शेतकरी चिदानंद जंगलकी, गजानन जंगलकी व इतर शेतकरीबांधव उपस्थित होते. हा उपक्रम घेण्यासाठी लोकमंगल कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सचिन फुगे सर, कार्यक्रम अधिकारी प्रा. आकाश अवघडे सर, प्रा. डॉ. विशाल दळवी सर यांचे मार्गदर्शन लाभले. हा उपक्रम कृषिदूत महेश आढेगावकर, पंकज आयरे, संदीप चव्हाण, रोहित गडगे, प्रथमेश कुदळे यांनी राबविला.

# भूमिपुत्रांनी प्रात्यक्षिकद्वारे सांगितले बोर्ड मिश्रण तयार करण्याची आणि वापरण्याची पद्धत





माळकवठे : महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी संलग्नित लोकमंगल कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी ग्रामीण कृषी जागरूकता आणि कृषी औद्योगिक कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत बोर्डो मिश्रण प्रात्यक्षिकाद्वारे माळकवठे गावतील शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. पिकांवर पडणाऱ्या विविध बुरशीजन्य रोगांच्या नियंत्रणासाठी बोर्डो मिश्रण एक प्रभावी बुरशीनाशक आहे.

बोर्डो मिश्रणातील घटकयासाठी निळे स्फटीकमय मोरचूद, कळीचा चुना आणि पाणी हे प्रमुख तीन घटक वापरले जातात. एक टक्का तीव्रतेचे शंभर लिटर द्रावण तयार करायचे असल्यास, एक किलो मोरचूद आणि एक किलो कळीचा चुना लागेल.यासाठी एक किलो मोरचूद रात्रभर ५० लिटर पाण्यामध्ये भिजत घालावा. प्लॅस्टिकच्या दुसऱ्या ड्रममध्ये ५० लिटर पाण्यात एक किलो चुना भिजत ठेवावा. हे दोन्ही द्रावण काठीने हलवून घ्यावे. मोरचूद आणि चुन्याचे द्रावण तिसऱ्या १०० लिटर ड्रममध्ये समप्रमाणात ओतत राहावेत. मिश्रण ओतताना ते काठीने ढवळत राहावे. या तयार झालेल्या मिश्रणाला बोर्डो मिश्रण असे म्हणतात.

बोर्डो मिश्रण तयार करण्यासाठी -

- वापरलेला कळीचा चुना हा खडक विरहीत असावा.
- बोर्डो मिश्रण हे प्लॉस्टिक ड्रम किंवा प्लॉस्टिक बादलीमध्ये तयार करावे.
- मिसळताना दोन्ही द्रावण थंड राहतील याची काळजी घ्यावी.
- तयार केलेले बोर्डो मिश्रण जास्त काळ ठेऊ नये. ठेवायचे
- असल्यास कळीचा चुना आणि मोरचूदचे द्रावण मिक्स करू नये.
- बोर्डो मिश्रणाची फवारणी करण्यासाठी ते फवारणी यंत्रामध्ये भरताना गळून मगच भरावे.

अशा पद्धतीने मिश्रण तयार करून कमी खर्चात रोगावर नियंत्रित केले जाते असा संदेश भूमिपुत्रांनी शेतकऱ्यांना दिला. हा उपक्रम विजय काटकर,अजय कांबळे,अमर कोकरे, गुरुदेव जाधव, ज्ञानेश्वर काशीद,शुभम केकान,योगेश माने यांनी राबवला. हा उपक्रम घेण्यासाठी लोकमंगल कृषी महाविद्यालय, वडाळा येथील डॉ सचिन फुगे सर,प्रा आकाश अवघडे व प्राध्यापिका ज्योती जाधवर मॅडम यांचे मार्गदर्शन लाभले.

Dainik.Rajaswa @dainik_rajaswa




महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी संलग्नित व श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान वडाळा संचलित लोकमंगल कृषी महाविद्यालय वडाळा ता. उत्तर सोलापूर जि. सोलापूर अंतर्गत ग्रामीण जागरूकता कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत कृषीदुतांनी मुरघासाची प्रात्यक्षिक करून दाखवले. हिरवा चारा हवा विरहित जागेत ठराविक काळ ठेवल्यावर अंबवण्याची क्रिया होऊन तो चारा तयार होतो त्यास मुरघास असे म्हणतात. मुरघासामध्ये हिरव्या चाऱ्यामध्ये पाण्याचे प्रमाण राखले जाते. पौष्टिकतेत व चवीत वाढ झाल्यामुळे जनावरे आवडीने खातात.

ग्रामीण भागातील शेतकरी मोठ्या प्रमाणात शेती पूरक व्यवसाय म्हणून दुग्ध व्यवसायाकडे वळला आहे. परंतु खर्च आणि उत्पन्नाचे ताळमेळ लागत नसल्याने शेतकरी निराश होतात. मात्र खर्च कमी करून उत्पन्न वाढीव भर दिली तर व्यवसाय फायद्याचा होऊ शकतो शेतकऱ्यांना उन्हाळ्यात हिरवा चारा उपलब्ध होत नाही. त्यामुळे कृषी दुतांनी मुरघासाचे महत्त्व, फायदे प्रात्यक्षिकरित्या करून दाखवली. लोकमंगल कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सचिन फुगे सर, कार्यक्रम अधिकारी प्रा. आकाश अवघडे सर, प्रा. ज्ञानसागर सुतार सर यांचे मार्गदर्शन लाभले कृषीदूत महेश आढेगावकर, पंकज आयरे, संदीप चव्हाण, रोहित गडगे,रोहन कौरती, प्रथमेश कुदळे यांनी प्रात्यक्षिक केले.

Dainik.Rajaswa @dainik_rajaswa

# भंडारकवठे येथे जनावरांना मोफत लसीकरण...........



भंडारकवठे ता. दक्षिण सोलापूर जि. सोलापूर येथे लोकमंगल कृषी महाविद्यालयाच्या वतीने कृषी दूतांकडून दुभत्या व इतर जनावरांसाठी मोफत लसीकरण शिबिर घेण्यात आले. जनावरांना लंपी संसर्गाचा वाढणारा धोका लक्षात घेऊन जनावरांचे मोफत लसीकरण करण्यात आले. जनावरांच्या लसीकरणामुळे लंपी संसर्गापासून संरक्षण होऊन शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होण्यास मदत होणार आहे. ५३८ जनावरांना लस देण्यात आली .यासाठी भंडारकवठेचे सरपंच भीमाशंकर बबलेश्वर, उपसरपंच व इतर सदस्य, लोकमंगल कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सचिन फुगे सर, प्रा. ज्ञानसागर सुतार सर, प्रा. आकाश अवघडे सर यांचे मार्गदर्शन तर डॉ. सत्यजित पाटील, अनिल अळगी यांचे सहकार्य लाभले. यावेळी लोकमंगल कृषी महाविद्यालयाचे कृषीदूत महेश आढेगावकर, पंकज आयरे, संदीप चव्हाण, रोहित गडगे, रोहन कौरती, प्रथमेश कुदळे यांचे सहकार्य लाभले.